RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५२

दि. १४ जून २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेकडून देशाच्या अत्याधुनिक संरक्षण क्षमतांचे प्रात्यक्षिक सादर

**मुंबई/प्रतिनिधी** : संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने शत्रूकडून असणाऱ्या विविध प्रकारच्या धोक्यांविरुद्ध देशाच्या संरक्षण क्षमतांना बळकटी देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांचे यशस्वी प्रात्यक्षिक सादर केले. १० आणि ११ जून २०२६ रोजी सलग तीन उड्डाण-चाचण्या करण्यात आल्या असून, दीर्घ पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांविरुद्ध बहुस्तरीय संरक्षण क्षमता तसेच मध्यम पल्ल्याच्या जहाजविरोधी क्षमता प्रदर्शित करण्यात आली.

बहुस्तरीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण क्षमता यशस्वीपणे दाखवण्यात आली. अवरोधक क्षेपणास्त्रांनी आपापली लक्ष्ये यशस्वीरीत्या भेदली. उदयोन्मुख क्षेपणास्त्र धोक्यांना तोंड देण्यासाठी या प्रणाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आल्या आहेत.

या चाचण्यांमुळे आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांपर्यंत लक्ष्य भेदण्याची क्षमता असलेल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली असणाऱ्या निवडक देशांच्या गटात भारताचा समावेश झाला आहे. नौदलाच्या मध्यम पल्ल्याच्या जहाजविरोधी क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणीही यशस्वीपणे पार पडली. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था तसेच संरक्षण दलातील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांचे यशस्वी प्रात्यक्षिक सादर केल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओचे अभिनंदन केले आहे. संरक्षण संशोधन व विकास विभागाचे सचिव तथा डीआरडीओचे अध्यक्ष राजेश कुमार सिंह यांनी या चाचण्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले आणि डीआरडीओ व उद्योग क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले.

## राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२६ मध्ये महाराष्ट्राला दोन सुवर्ण पुरस्कार

**मुंबई/प्रतिनिधी** : ई-गव्हर्नन्स राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राने मानाचे स्थान मिळवले आहे. डिजिटल प्रशासन आणि नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून सेवा पुरवण्याच्या क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी, महाराष्ट्रातील पंचायती राज विभागाशी संबंधित दोन उपक्रमांना सुवर्ण पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

यामध्ये सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील कडेपूर ग्रामपंचायतीला 'सेवा वितरणाचा विस्तार आणि सक्षमीकरणासाठी ग्रामस्तरावरील उपक्रम' या श्रेणीमध्ये सुवर्ण पुरस्कार जाहीर झाला आहे.

या ग्रामपंचायतीने एक सर्वसमावेशक 'एंड-टू-एंड' डिजिटल प्रशासन व्यवस्था उभी केली असून, तंत्रज्ञानावर आधारित ग्रामीण प्रशासनाचे एक आदर्श उदाहरण म्हणून ती समोर आली आहे. पूर्णपणे कागदविरहित ई-ऑफिस प्रणाली राबवणारी ही देशातील पहिली ग्रामपंचायत ठरली असून, याद्वारे ४,३२१ लाभार्थ्यांना १,३५५ पेक्षा जास्त ऑनलाइन सेवा देण्यात आल्या आहेत. तसेच, एकात्मिक डिजिटल पेमेंट प्रणालीचा अवलंब केल्यामुळे महसूल संकलनात २१ टक्क्यांची वाढ झाली आहे.

नव्या आणि प्रगत तंत्रज्ञानाचा अत्यंत कल्पकतेने वापर करत कडेपूर ग्रामपंचायतीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आठ वेगवेगळ्या ॲलकेशन्सची अंमलबजावणी केली आहे. यामध्ये ग्रामपंचायत बैठकांचे संक्षिप्त सारांश तयार करणे, विविध शासकीय योजनांसाठी पात्र लाभार्थी ओळखणे, शासन निर्णय शोधून काढणे, प्रशासकीय कामांसाठी 'स्मार्ट नोटिंग' तयार करणे, माहितीचे अचूक विषण करणे आणि माहिती अधिकारांतर्गत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वयंचलित पद्धतीने तयार करणे अशा अनेक सुविधांचा समावेश आहे. या डिजिटल उपक्रमांमुळे गावपातळीवरील प्रशासकीय कामांचा वेग तर वाढलाच, शिवाय नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्येही मोठी सुधारणा झाली आहे.

त्याचबरोबर, 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाच्या मदतीने सर्व डिजिटल दस्तऐवज आणि नोंदी सुरक्षित व फेरफारमुक्त ठेवण्यात ग्रामपंचायतीला यश आले आहे. 'जीआयएस' तंत्रज्ञानावर आधारित मॅपिंगद्वारे गावातील ३०९ नवीन घरांचे जिओ-टॅगिंग (भौगोलिक स्थान निश्चिती) करण्यात आले, ज्यामुळे घरपट्टीतून मिळणाऱ्या महसुलात सुमारे ७.५ लाख रुपयांची भर पडली आहे.

'मेरी पंचायत' ॲच्या माध्यमातून कडेपूर ग्रामपंचायतीने नागरिकांच्या १,७३६ तक्रारींचे १०० टक्के वेळेत आणि यशस्वी निवारण केले आहे. याशिवाय, 'निर्णय' ॲपद्वारे ग्रामसभेच्या सर्व ६० बैठकांचे पूर्वनियोजन करण्यात आले; ज्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामसभेत सहभागी होणाऱ्या नागरिकांची संख्या आणि त्यांचे योगदान संपूर्ण देशात सर्वाधिक नोंदवले गेले आहे.

विशेष म्हणजे, ई-गव्हर्नन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, नॅनो-टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी आणि रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत अधिकृतपणे धोरणे मंजूर करणारी ही भारतातील एकमेव ग्रामपंचायत ठरली आहे. तंत्रज्ञानाचा हा सुनियोजित आणि भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन कडेपूर ग्रामपंचायतीला तळागाळातील प्रशासनात देशात अग्रेसर बनवतो.

# 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' पाहण्यासाठी पर्यटक येतील असा गावाचा विकास होणार

## श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील प्रस्तावित 'हेरिटेज वाडी' जागेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पाहणी

**पुणे/प्रतिनिधी** : श्रीक्षेत्र भीमाशंकर परिसराचा धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या शाश्वत विकास साधण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पाच्या जागेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. यावेळी प्रकल्पाचा आराखडा, पुनर्वसन प्रक्रिया तसेच स्थानिकांसाठी प्रस्तावित सुविधांबाबतची माहिती त्यांनी घेतली. 'हेरिटेज वाडी' पाहण्यासाठी पर्यटक येतील असं गाव होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

त्यांच्यासमवेत आमदार दिलीप वळसे-पाटील, बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, वन विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी पाहणीदरम्यान प्रकल्पातील विविध घटक, पुनर्वसन प्रक्रिया, स्थानिकांच्या अपेक्षा तसेच भाविकांसाठी प्रस्तावित सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. भीमाशंकरच्या धार्मिक आणि पर्यावरणीय महत्त्वाचा विचार करून विकास आणि संवर्धन यांचा समतोल राखत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पामुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, ग्रामस्थांच्या जीवनमानात सुधारणा, भाविकांसाठी दर्जेदार सुविधा आणि पर्यटन विकासाला चालना मिळेल आणि परिसराचे



परिवर्तन घडून येईल, असा विश्र्वास यावेळी श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

ग्रामस्थांनी प्रकल्पासाठी केलेल्या सहकार्याचा मुख्यमंत्र्यांनी विशेष उल्लेख केला. परिसरातील १५० घरांना इतरत्र जागा देऊन चांगल्या गावाची रचना करण्यात येत आहे, जेणेकरून भाविक मंदिरासोबत गावातही जातील आणि गावाची अर्थव्यवस्था बदलेल. रस्ते, ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्युत वाहन, दुकानांची रचना, बस स्थानक आदींचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. इथे करण्यात येणाऱ्या सुविधेमुळे भाविकांची संख्या वाढेल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रकल्पाची माहिती दिली. ते म्हणाले, भीमाशंकर गावाचे नियोजित पुनर्वसन, भाविकांसाठी आधुनिक सुविधा आणि स्थानिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. मूळ गावापासून अवघ्या १५० मीटर अंतरावर सुमारे १०.५ एकर क्षेत्रात 'हेरिटेज वाडी' विकसित करण्यात येणार असून त्यामध्ये पारंपरिक वास्तुशैली आणि आधुनिक सुविधांचा समन्वय साधण्यात येणार आहे.

स्थानिकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी ४० हून अधिक व्यावसायिक युनिट्सची तरतूद करण्यात आली आहे. 'विस्थापनाऐवजी पुनर्रचना' या संकल्पनेवर आधारित हा प्रकल्प असून ग्रामस्थांचे सामाजिक व सांस्कृतिक नाते अबाधित ठेवत जवळच्या परिसरातच पुनर्वसन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रस्तावित 'हेरिटेज वाडी'मध्ये वारसा प्रवेशद्वार, ग्रामपंचायत कार्यालय, सामुदायिक सभागृह, सार्वजनिक सुविधा केंद्र तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. 'लाइव्हलीहुड अपग्रेडेशन' संकल्पनेअंतर्गत नव्या वसाहतीचे नियोजन भाविक व पर्यटकांसाठी सेवा केंद्र म्हणून करण्यात येत असून त्यामुळे स्थानिकांना पर्यटनाशी संबंधित विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. याशिवाय, मंदिर परिसरातील जवळपास १०० टक्के रहिवाशांचे नियोजनबद्ध पुनर्वसन करण्यासाठी 'झिरो फ्रिक्शन मॉडेल'चा अवलंब करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे राबविता येतील.

## ऑपरेशन शोध-४ अंतर्गत शिवाजीनगर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; वस्तीगृहातून निघून गेलेली दोन मुले पालकांच्या ताब्यात

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र पोलीस दलामार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन शोध-४ या विशेष मोहिमेअंतर्गत हरवलेली, बेपत्ता झालेली तसेच विविध कारणांनी घरापासून दूर गेलेली मुले शोधून त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. या मोहिमेदरम्यान शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी उल्लेखनीय कामगिरी करत वस्तीगृहातून निघून गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात सुखरूप दिले आहे.

संबंधित दोन्ही मुले काही कारणास्तव वस्तीगृहातून कोणालाही न सांगता निघून गेली होती. मुलांच्या बेपत्ता होण्याची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी तात्काळ शोध मोहीम हाती घेतली. परिसरातील




विविध ठिकाणी चौकशी, तांत्रिक माहितीचे विश्र्लेषण तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने शोधकार्य राबविण्यात आले.

अखंड प्रयत्नांनंतर पोलिसांनी दोन्ही मुलांचा शोध लावून त्यांची समुपदेशनपूर्वक विचारपूस केली. त्यानंतर सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. आपल्या मुलांना सुखरूप परत मिळाल्याने पालकांनी भावूक होत शिवाजीनगर पोलिसांचे आभार व्यक्त केले.

ऑपरेशन शोध-४ ही मोहीम केवळ हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यापुरती मर्यादित नसून त्यांचे पुनर्वसन, समुपदेशन आणि कुटुंबाशी पुनर्मिलन घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्यदेखील करत आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, परिसरात कोणतेही मूल संशयास्पद परिस्थितीत आढळल्यास अथवा हरवलेल्या मुलांबाबत कोणतीही माहिती असल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. समाजातील प्रत्येक नागरिकाच्या सहकार्यामुळे अशा मुलांना त्यांच्या कुटुंबापर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे.

हरवलेल्या मुलांच्या शोधासाठी संवेदनशीलता, तत्परता आणि मानवी दृष्टिकोनातून कार्य करणाऱ्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. ऑपरेशन शोध-४ अंतर्गत सुरू असलेली ही मोहीम पुढील काळातही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे.

## ओमानच्या किनाऱ्याजवळ अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांच्या मृत्यूबाबत जयशंकर यांची रुबिओ यांच्याशी चर्चा

वॉशिंग्टन : परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री (सेक्रेटरी ऑफ स्टेट) मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली आणि आखाती भागात अमेरिकन नौदलाने केलेल्या हल्ल्यांवर तीव्र आक्षेप नोंदवला; या हल्ल्यांमध्ये तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला होता. रुबिओ यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत 'एक्स' वरील एका पोस्टमध्ये जयशंकर यांनी म्हटले आहे की, ''व्यापारी जहाजांविरुद्ध अशा प्रकारची जीवघेणी कारवाई समर्थनीय नाही.'' या आठवड्यात ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय कर्मचारी असलेल्या तीन जहाजांवर हल्ले झाले; यापैकी एका घटनेत बुधवारी तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला.

जयशंकर म्हणाले की, ''आज संध्याकाळी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली. आखाती भागात अमेरिकन नौदलाने केलेल्या हल्ल्यांमुळे तीन भारतीय खलाशांचा बळी गेला, त्याबद्दल भारताचा तीव्र आक्षेप मी पुन्हा एकदा व्यक्त केला.'' या प्रकरणावर आपला निषेध नोंदवण्यासाठी भारताने नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाच्या 'चार्ज डी'अफेअर्स'ना (राजदूत अनुपस्थित असताना काम पाहणारे वरिष्ठ अधिकारी) बोलावून घेतले होते. यापूर्वी शुक्रवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ'मधून जाणाऱ्या भारतीय जहाजांवर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप केला.

## विवेकानंद चौक पोलिसांची दुहेरी कामगिरी; १४ लाखांच्या सोन्याच्या चोरीचा उलगडा तर जनावरे चोरीचा प्रयत्नही हाणून पाडला

**लातूर/प्रतिनिधी** : कायद्याचा धाक निर्माण करणे आणि नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही पोलिसांची प्राथमिक जबाबदारी असते. मात्र ही जबाबदारी केवळ गुन्हा घडल्यानंतर तपास करण्यापुरती मर्यादित नसून, नागरिकांना तात्काळ मदत करणे, नुकसान टाळणे आणि गुन्हेगारांपर्यंत वेगाने पोहोचणे हे देखील तितकेच महत्त्वाचे असते. याच कर्तव्यदक्षतेचे आणि कार्यक्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण विवेकानंद चौक पोलीस ठाण्याने अवघ्या काही तासांच्या कालावधीत दिले आहे. एका बाजूला १४ लाख रुपयांहून अधिक किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीचा उलगडा करून महिला आरोपीला अटक करण्यात आली, तर दुसऱ्या बाजूला चोरीस नेण्यात आलेल्या तीन बैलांचा गुन्हा नोंद होण्यापूर्वीच शोध घेऊन शेतकऱ्याला दिलासा देण्यात आला.

पहिल्या घटनेत, एलआयसी कॉलनी परिसरातील फिर्यादीच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने अंदाजे ९ तोळे ९ ग्रॅम वजनाचे, सुमारे १४ लाख ४८ हजार ५५० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असलेली पर्स चोरी केली होती. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रणजितसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांचे नेतृत्वात गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाला तपासासाठी नियुक्त केले. गुप्त माहितीदार, तांत्रिक विश्र्लेषण आणि शास्त्रीय तपासाच्या आधारे पोलिसांनी अल्पावधीतच आरोपीचा शोध घेतला. तपासादरम्यान शामल मोहन राठोड (वय ४० वर्षे, रा. कन्हेरी तांडा, ता. जि. लातूर) हिला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तिने गुन्ह्याची कबुली दिली असून तिच्याकडून चोरीस गेलेल्या मालापैकी ९ तोळे ४ ग्रॅम वजनाचे, सुमारे १३ लाख ६३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

दुसऱ्या घटनेत, सारोळा येथील शेतकरी विभीषण संपती बनसोडे यांच्या शेतातून मध्यरात्री तीन बैल चोरीस नेण्यात आले होते. शेजारील नातेवाईकाने बैल ओरडत असल्याची माहिती दिल्यानंतर मालकाने डायल ११२ वर संपर्क साधला. माहिती मिळताच विवेकानंद चौक पोलीस ठाण्यातील कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार त्रिंबकेश्र्वर अनिल विरकर आणि दीपक आबाजी सोनकांबळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

रात्रीच्या अंधारात परिसरातील शेतशिवार, बांध आणि रस्त्यांवर कसून शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर घटनास्थळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील एका शेताच्या बांधावर अंधारात बांधून ठेवलेले तीनही बैल पोलिसांना आढळून आले. त्यानंतर बैलांची ओळख पटवून ते शेतकरी विभीषण बनसोडे यांच्या ताब्यात देण्यात आले. या तत्पर कारवाईमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान टळले.

या दोन्ही घटनांमधून विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांची सतर्कता, तात्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता आणि गुन्हे उघडकीस आणण्यातील कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे. एकीकडे लाखो रुपयांच्या मालमत्तेची चोरी उघडकीस आणून आरोपीला अटक करण्यात आली, तर




दुसरीकडे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन असलेली जनावरे वेळेत शोधून त्यांना दिलासा देण्यात आला.

सदर दोन्ही कारवाया पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे सूचनेनुसार, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रणजितसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या नेतृत्वात पार पडल्या.

दोन्ही चोरी प्रकरणाच्या तपासात सहाय्यक फौजदार आर. एन. गोंदकर, पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, राणवीर देशमुख योगेश गायकवाड, सचिन राठोड,त्रिंबकेश्र्वर अनिल विरकर, दीपक आबाजी सोनकांबळे यांनी दाखविलेली तत्परता उल्लेखनीय ठरली.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी आणि गुन्हेगारांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्यासाठी लातूर पोलीस दल कटिबद्ध असून, विवेकानंद चौक पोलिसांच्या या दुहेरी यशस्वी कामगिरीमुळे नागरिकांमध्ये कौतुक होत आहे.

# पावसाळी अधिवेशनात सादर होणार महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक - मुख्यमंत्री

## महिला शेतकऱ्यांना मिळणार स्वतंत्र ओळख

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा. कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन अशा विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या बाबींचा समावेश करावा.

'महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी'

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी' स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण करेल. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून कृषी क्षेत्रात लिंगसमतेच्या दिशेने एक नवा आदर्श निर्माण करेल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

यावेळी महिला सक्षमीकरण विधेयकाचे सादरीकरण कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी केले.

या बैठकीला मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए शैला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, विधि व न्याय विभागाच्या सचिव सुप्रिया धावरे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, ग्राम विकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, पदुम विभागाचे सचिव डॉ एन.रामास्वामी, महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ.अनुप कुमार यादव, व्ही. सी.व्दारे एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सौम्या स्वामीनाथन, विधि सेंटर फॉर लीगल पॉलिसीच्या जिनाली दानी तसेच एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या प्रतिनिधी तेजश्री उपाध्ये आणि दर्शिता तुमणे यावेळी उपस्थित होते.

# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालूया !

# जि.प.च्या शाळांना प्रवेशासाठी निवडूया

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे ''आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?''

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात.









आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

**मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे**

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

**सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जातात.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे. शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

**राज्याचे शैक्षणिक धोरण ;मातृभाषेचे महत्त्व**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्यांच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

**आता प्रवेशासाठी लागतात रांगा**

एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते.अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून,कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

**नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली**

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे.गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे. त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे. शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे.निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

**अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार**

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय.घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे.अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील.

त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

**चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या. आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू या!

---------------

**प्रवीण टाके**
**उपसंचालक, (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**

## संपादकीय...

### व्याप्त काश्मीर पुन्हा पेटले!

उभे जग ज्याला व्याप्त काश्मीर म्हणून ओळखते, तो भारताचा भूभाग म्हणजे केवळ भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील जमिनीचा वाद नव्हे. भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचा सुंदर आविष्कार असलेल्या जनजीवनाची आणि देशाच्या संपन्न संस्कृतीची झालेली ती वेदनादायी फाळणी आहे. त्या फाळणीचे ओरखडे मनावर वागवत, सहन करत आपले हरवलेले हक्क पुन्हा मिळविण्यासाठी स्वातंत्र्याची चातकासारखी वाट पाहणाऱ्या लाखो नागरिकांची ती वेदना आहे. व्याप्त काश्मीरचा इतिहास आणि वर्तमान काहीही असले, तरी या प्रांताचे भविष्य मात्र आता निर्णायक वळणावर उभे आहे. पाकिस्तानची खालावलेली आर्थिक स्थिती आणि व्याप्त काश्मीरमधील स्थानिक जनतेत धुमसणारा तीव्र असंतोष पाहता, हा प्रदेश फार काळ पाकिस्तानच्या जुलमी राजवटीखाली राहू शकणार नाही, अशी चिन्हे दिसत आहेत. भारताची आर्थिक आणि जागतिक ताकद पाहता, भविष्यात हा भूभाग पुन्हा एकदा अखंड भारताचा भाग बनेल आणि भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा मानबिंदू असलेल्या शारदा पीठाचा हरवलेला गौरव परत येईल, हीच प्रत्येक भारतीयाची आणि तेथील त्रस्त जनतेची अपेक्षा आहे. भौगोलिकदृष्ट्या उंचावर असलेला, मुळात भारताच्या नकाशाचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश राजकीय आणि भावनिकदृष्ट्याही संवेदनशील आहे. म्हणूनच स्वातंत्र्यापासून आजपर्यंत तो सातत्याने भारत आणि पाकिस्तानमधील वादाचे मुख्य केंद्र राहिला आहे. हा वाद केवळ लष्करी कारवाया आणि सीमेच्या रक्षणापुरता मर्यादित नाही. कारण व्याप्त काश्मीर म्हणजे केवळ राजकीय नकाशाचा तुकडा नाही. या प्रदेशाची माती, त्या मातीतील माणसे, त्यांचा इतिहास, परंपरा यांची एक वेगळी ओळख आहे. ती ओळख भारताच्या संस्कृतीशी जोडलेली आहे. एके काळी सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या या प्रदेशाचे गेल्या सुमारे आठ दशकांत पाकिस्तानने पद्धतशीरपणे इस्लामीकरण केले आहे. इतिहासकाळात भारतीय उपखंडातील ज्ञान आणि संस्कृतीचे मोठे केंद्र असलेले नीलम व्हॅलीमधील शारदा पीठ आज भग्नावस्थेत आणि लष्करी छावणीच्या विळख्यात अडकले आहे. हिंदू-बौद्ध संस्कृतीचा हा विलोभनीय वारसा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या प्रदेशाची अस्मिता असलेल्या पाश्तो, हिंदको, शिना, बाल्टी आणि पहाडी या स्थानिक भाषा पाकिस्तानने लादलेल्या उर्दू आणि पंजाबी संस्कृतीमुळे संकटात सापडल्या आहेत. जेथे भाषांचे अस्तित्व संकटात येते, तेथील संस्कृतीदेखील धोक्यात येते, हा इतिहास आहे. भाषा हे सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असते. व्याप्त काश्मीरमधील स्थानिक भाषांचे भवितव्य संपविण्याच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे तेथील संस्कृतीदेखील अशीच संकटात सापडल्याची जनतेची भावना आहे. मुख्यतः शियाबहुल भूभाग असलेल्या या प्रदेशात जाणीवपूर्वक सुन्नी समाजाचे पुनर्वसन केल्याने स्थानिक जनजीवनाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे निर्माण होत असलेल्या असंतोषातून सतत सुरू असलेल्या जातीय हिंसाचारात व्याप्त काश्मीर धुमसत राहिले आहे. येत्या २७ जुलै रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर पाकिस्तानी सुरक्षा दलांनी गोळीबार केला. संतप्त जनतेने रस्त्यावर उतरून प्रचंड आंदोलन उभे केले आणि ते चिरडण्यासाठी पाकिस्तानी सैन्याकडून अंदाधुंद हत्याकांड सुरू झाले. गेल्या काही दिवसांत शेकडो नागरिकांना पाकिस्तानी सैनिकांनी गोळ्या घालून ठार केल्याच्या बातम्या असल्याने, भारताशी सांस्कृतिक आणि भौगोलिक नाते असलेल्या या प्रदेशातील नागरिकांच्या चिंतेने उभा देश अस्वस्थ झाला आहे. पाकिस्तानला या हत्याकांडाबद्दल जाब विचारला जावा, यासाठी भारताने दबाव आणण्यास सुरुवात केल्याने, तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि मानवी हक्कांचा मुद्दा जागतिक स्तरावर पोहोचला आहे. पाकिस्तानच्या विळख्यातून हा प्रदेश मुक्त करण्याच्या आणि भारतासोबतचे दुरावलेले नाते पुन्हा जोडण्याच्या जुन्या प्रयत्नांना आता वेग आला आहे. हा वाद जितका जुना तितकाच गुंतागुंतीचादेखील आहे. व्याप्त काश्मीरचे भविष्य केवळ भारत आणि पाकिस्तानपुरते मर्यादित राहिलेले नाही, त्यात चीनचाही प्रवेश झाला आहे. चीन आणि पाकिस्तानमधील आर्थिक कॉरिडॉर उभारणीच्या प्रकल्पांतर्गत, भारताचा भूभाग असलेल्या या प्रदेशात अब्जावधी डॉलर्स खर्च करून रस्ते आणि रेल्वे नेटवर्क उभारणीच्या चीनच्या बेकायदा कारवायांना भारताने सातत्याने विरोध सुरू ठेवला आहे.लर्लीळिशव ज्ञ्रीहाळी कलम ३७० रद्द केल्यानंतर भारताने व्याप्त काश्मीरबाबत अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक भूमिका घेतली. भारताचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश परत मिळवणे हेच भारताचे ध्येय आहे, ही भूमिका भारताकडून सातत्याने व ठामपणे मांडली जात आहे. पाकिस्तानकडून भविष्याची कोणतीही हमी नसल्याच्या भावनेने ग्रासलेल्या स्थानिक जनतेच्या असंतोषाला भारताच्या या भूमिकेमुळे मोठे बळ मिळत असल्याने व्याप्त काश्मीर आणि गिलगीट, बाल्टिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधात अभूतपूर्व निदर्शने होत आहेत. महागाई, अन्नपदार्थांचा तुटवडा आणि विजेच्या वाढत्या किमतींमुळे त्रस्त झालेले लोक भारतात सामील होण्याची भावना तर उघडपणे बोलून दाखवू लागले आहेत. व्याप्त काश्मीरमधील सर्वांत मोठी नागरी संघटना असलेल्या संयुक्त अवामी कृती समितीवर पाकिस्तान सरकारने दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत बंदी घातल्याने या प्रदेशातील हिंसाचार उफाळला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. या हिंसाचाराची दखल जगाने घेतली आहेच. पाकिस्तानमधील मानवाधिकार आयोगानेही त्याबद्दल चिंता व्यक्त केल्याने, आंदोलनास नैतिक बळ मिळाले आहे. भारताच्या भूमिकेस पोषक अशा घडामोडींचे एक नवे पर्व सुरू होत आहे. त्याला हिंसाचाराची दुर्दैवी किनार आहे. पण जेव्हा जनता आपल्या मागण्यांसाठी ठामपणे उभी राहते, तेव्हा अशा आंदोलनांची ताकद वाढत असते. फाळणीनंतर देशातील साडेपाचशेहून अधिक संस्थानांप्रमाणेच, जम्मू-काश्मीरचे तत्कालीन शासक महाराजा हरि सिंह यांनीही जम्मू-काश्मीर भारतात विलीन केले होते. मात्र, १९४७-४८ मध्ये पाकिस्तानने दहशतवादी आणि सैन्य थेट जम्मू-काश्मीरमध्ये घुसविले. त्यातून भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीने झालेल्या युद्धविरामानंतर जम्मू-काश्मीरचा हा सुमारे ३५ टक्के भूभाग बेकायदा पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. फेब्रुवारी १९९४ मध्ये भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मंजूर केला आणि पाकिस्तानने बळकावलेला हा भूभाग भारताच्या स्वाधीन करावा या मागणीचा हुंकार देशभर उमटला. नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असलेल्या या प्रदेशातून पाकिस्तानला मोठा सामरिक आणि आर्थिक फायदा मिळतो. सिंधू नदीच्या आधाराने वसलेल्या या प्रदेशात जलविद्युत निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. तसेच जंगलसंपत्ती आणि ग्रॅफाईट, बेंटोनाईट, लिमोनाईट, संगमरवर आणि मौल्यवान रत्ने यांसारखी खनिज संपत्तीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. पाकिस्तानातील पंजाब आणि सिंध प्रांतांतील शेतीसाठी लागणाऱ्या सिंचनाच्या पाण्यापैकी मोठा हिस्सा या प्रदेशातूनच मिळतो, पण या प्रदेशातील साधनसंपत्तीचा मुख्य भूभागासाठी वापर करणाऱ्या पाकिस्तानकडून स्थानिक जनतेस मात्र कोणतेच आर्थिक लाभ दिले जात नाहीत. कुपोषण, अन्नसमस्या, माता- बालमृत्यूंचे थैमान, सुविधांचा अभाव यामुळे भविष्याविषयीच्या आशा खुंटलेल्या या प्रदेशास भारताच्या ठाम भूमिकेमुळे मोठा दिलासा मिळत राहिला ही त्यातील समाधानाची बाब ठरते. 'आझाद काश्मीर' असे नाव असलेल्या या प्रदेशात पाकिस्तानला स्वातंत्र्याची प्रतिमा दिसत असली तरी प्रत्यक्षात मात्र, राजकीयदृष्ट्या मर्यादित स्वायत्तता, आर्थिक शोषण आणि सामाजिक-आर्थिक मागासलेपण अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या या प्रदेशाला मुक्तीची भूक लागली आहे. ताजे आंदोलन आणि त्यावरील दडपशाहीमुळे मुक्तीचा मार्ग निर्णायक वळणावर येण्याची चिन्हे असून, तसे झाले, तर भारताच्या भूमिकेचा मोठा विजय दृष्टिपथात येत असल्याचे समाधानही आता अनुभवता येणार आहे. दीर्घकाळापासूनचा हा संवेदनशील जाणिवांचा गुंता आता भारताने अधिक काळ सहन करू नये, हीच व्याप्त काश्मिरी जनतेची आणि तमाम भारतीयांची अपेक्षा आहे. कारण या गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळे तेथील जनतेची घुसमट सुरू आहे. तेथे पाकिस्तानने स्वातंत्र्याचा मुखवटा चढविला असला, तरी जनता पारतंत्र्याच्या जाणिवांनी खंतावलेली आहे. दीर्घकाळापासून हरवलेली ओळख पुन्हा मिळविण्यासाठी आणि तुटलेले सांस्कृतिक नाते पुन्हा जोडण्यासाठी तेथील जनता उत्सुक आहे.

# चाकूर पंचायत समिती अंतर्गत शेकडो कोटींचा भ्रष्टाचार ; ६ जुलैपासून आमरण उपोषण बसणार- बालाजी पाटील चाकूरकर



**चाकूर/प्रतिनिधी** : चाकूर तालुक्यातील पंचायत समितीच्या माध्यमातून विविध योजने मार्फत करण्यात येत असलेल्या विविध सार्वजनिक कामासह शेतकऱ्यांच्या वैयक्तिक कामात मनरेगा, रोहयो, घरकुल योजना यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. कर्मचाऱ्यांना टक्केवारी दिल्याशिवाय बिल निघत नाही. अन्यथा विविध तांत्रिक अडचणी समोरे जावे लागते. या टक्केवारीच्या माध्यमातून अनेकांची वरकमाई झाल्याचे निष्पन्न झाले आहे. असे अनेक आरोप पुराव्याद्वारे बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहेत.

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून चाकूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सत्तर ग्रामपंचायती ग्रामपंचायत अंतर्गत येणारे ८४ गावातील शासकीय विहीर, गोठे शौचालय, पानंद रस्ते, जलजीवन, ९५५ एमआरजीएस ( चठएत्रड्ड), शेततळे आदी कामातील भ्रष्टाचाराची २०१५ ते २०२६ पर्यंतच्या सर्वच कामाची एसआयटी चौकशी करण्यात यावी याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रोजगार हमी योजना मंत्री तथा ग्राम विकासमंत्री भरतशेठ गोगावले, पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, महाराष्ट्र राज्याचे सचिव डॉ.राजेश अग्रवाल, ग्रामविकास विभागाचे सचिव श्रीमान चंद्रकांत पूलकुंडवार यांच्यासह राज्याच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन अंदाजे २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते बालाजी पाटील चाकूरकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील ३७७ तालुक्यांमध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार झाला असून प्रायोगिक तत्त्वावर मी स्वतःचा चाकूर तालुका प्रथम हातावर घेतला आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्यातील मनरेगातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोदून काढणार असल्याचे बालाजी पाटील चाकूरकर यांनी सांगितले आहे. भ्रष्टाचाराची चौकशी निपक्षपाती करून संबंधित दोषी आढळणाऱ्या प्रत्येक जणावर कारवाई करण्यात यावी. ५ जुलै पर्यंत कारवाई नाही झाली तर ६ जुलै पासून चाकूर शहर प्रवेशद्वाराशेजारी आमरण उपोषण करणार असल्याचे बालाजी पाटील चाकूरकर यांनी सांगितले आहे. त्यामुळे या भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांत भीती निर्माण झाली तर अन्यायग्रस्त नागरिकात न्याय मिळेल ही भावना निर्माण झाली आहे.

# 'उच्च व तंत्र शिक्षणात एकल पाल्य योजना' राबवण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत करावी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील एकल मातांच्या पाल्यांना उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात विविध सवलती, प्राधान्य व शैक्षणिक सुविधा मिळवून देण्यासाठी तसेच या विद्यार्थ्यांची अचूक नोंद घेण्यासाठी महाविद्यालयीन प्रवेश अर्जात 'एकल पाल्य' असा स्वतंत्र रकाना समाविष्ट करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सकारात्मक पावले उचलली आहेत. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमधील वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी आणि प्रवेश प्रक्रियेत एकल पाल्यांची अचूक नोंद घेण्याबाबत बुधवारी १७ जून २०२६ रोजी राज्यातील सुमारे १,५०० महाविद्यालयांच्या प्राचार्यांची विशेष ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात आतापर्यंत एकल मातांच्या पाल्यांची स्वतंत्र नोंद ठेवणारी यंत्रणा नसल्याने, यापुढे प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र व अचूक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य शासन आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या या संयुक्त पुढाकारामुळे एकल मातांच्या पाल्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी व शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी या समितीची मोठी मदत होणार आहे. या धोरणाची पुढील दिशा आणि प्रशासकीय पातळीवरील कृती आराखडा निश्चित करण्यासाठी 'साऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी आज उच्च शिक्षण संचालनालय (पुणे) कार्यालयाला भेट दिली. यावेळी 'एकल पाल्य योजना' अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी घ्यावयाच्या निर्णयांवर सविस्तर चर्चा झाली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकल मातांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर झाल्यानंतर, महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली गेली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व हेरंब कुलकर्णी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत स्वतंत्र उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे. महाविद्यालयांच्या प्रवेश अर्जात स्वतंत्र रकाना समाविष्ट करून अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशात प्राधान्य, समुपदेशन सुविधा आणि इतर आवश्यक सवलती संदर्भात अभ्यासकरून शासनाला अहवाल सादर करेल.

# आरपीआयची ताकद ख्रिश्चन समाजालाही मिळावी, यासाठीच ख्रिश्चन आघाडीची स्थापना : बाळासाहेब जानराव

## ख्रिश्चन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आरपीआय ख्रिश्चन आघाडी कटिबद्ध : ख्रिस्तोफर राजमनी

**पुणे/प्रतिनिधी** : रिपब्लिकन पक्षाची (आरपीआय) विचारधारा आणि सामाजिक न्यायाची चळवळ ख्रिश्चन समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचावी, तसेच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी ख्रिश्चन आघाडीची स्थापना करण्यात आल्याची माहिती आरपीआयचे नेते बाळासाहेब जानराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.या पत्रकार परिषदेला आरपीआयचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, सरचिटणीस महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, नगरसेविका हिमानी कांबळे, आरपीआय ख्रिश्चन आघाडीचे अध्यक्ष ख्रिस्तोफर राजमनी तसेच ख्रिश्चन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

जानराव म्हणाले, संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी आरपीआय सातत्याने संघर्ष करत आहे. या संघर्षात ख्रिश्चन समाजाचा अधिकाधिक सहभाग वाढावा आणि त्यांच्या प्रश्नांना संघटितपणे वाचा फुटावी, हा आघाडी स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समानता, बंधुता आणि न्यायाच्या विचारांवर आधारित समाजनिर्मितीसाठी सर्व धर्मीयांनी एकत्र येणे आवश्यक आहे. ख्रिश्चन आघाडीच्या माध्यमातून समाजातील युवक, महिला आणि विविध घटकांना नेतृत्वाची संधी मिळेल.

ते म्हणाले की, आजही ख्रिश्चन समाजातील मोठा वर्ग केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनांपासून अनभिज्ञ आहे. माहितीच्या अभावामुळे पात्र असूनही अनेक नागरिक या योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. ख्रिश्चन आघाडीच्या माध्यमातून समाजातील लोकांपर्यंत सरकारी योजनांची माहिती पोहोचविणे, त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे तसेच विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

ख्रिश्चन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आरपीआय ख्रिश्चन आघाडी कटिबद्ध : ख्रिस्तोफर राजमनी

ख्रिश्चन समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी आरपीआय ख्रिश्चन आघाडी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन ख्रिस्तोफर राजमनी यांनी केले. समाजातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन, तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाने ख्रिश्चन समाजाच्या कल्याणासाठी आणि त्यांना विविध शासकीय योजनांशी जोडण्यासाठी स्थापन केलेली आरपीआय ख्रिश्चन आघाडी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण बांधिलकीने कार्य करेल, अशी माहिती ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष ख्रिस्टोफर राजमनी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ख्रिस्तोफर



राजमनी यांनी ख्रिश्चन आघाडीच्या पुणे शहर कार्यकारिणीची घोषणा केली. त्यामध्ये डार्थी रॉड्रिक्स थॉमस (महिला अध्यक्षा), येसू जेम्स दोरास्वामी (उपाध्यक्ष), विनोद चंडालिया (ब्रदर) (पुणे कॅम्प विभागाध्यक्ष), फ्रान्सिस सांतामात्यि (हडपसर विभागाध्यक्ष), ओलोसिल प्रगासम (सोलापूर बाजार प्रभाग शाखाध्यक्ष), स्टेनली फ्रान्सिस नेथन (वानवडी शाखाध्यक्ष), विनेश पिल्ले (घोरपडी-मुंडवा प्रभागाध्यक्ष), रॉकी अँथोनी (वानवडी बाजार शाखाध्यक्ष), राजन राजमनी (कोंढवा शाखाध्यक्ष) तसेच रॉबर्ट दास (वडगाव शेरी शाखाध्यक्ष) यांच्यावर विविध पदांची जबाबदारी सोपविण्यात आली.

# संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना मोठा धक्का; भाचा प्रभात सिंह यांचा भीषण अपघातात मृत्यू

इंदौर : केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे भाचे प्रभात सिंह यांचा मध्य प्रदेशातील इंदौर येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. गुरुवारी रात्री उशिरा ही दुर्घटना घडली असून, भरधाव बसच्या धडकेत प्रभात सिंह गंभीर जखमी झाले होते. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभात सिंह हे कामानिमित्त इंदौरमध्ये आले होते. काम आटोपून ते आपल्या कारकडे परत जात असताना शिप्रा पोलीस ठाण्याजवळ भरधाव बसने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ते घटनास्थळीच बेशुद्ध झाले.

स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीअंती डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेमुळे सिंह कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



प्रभात सिंह हे उत्तर प्रदेशातील ँरत्तर येथील रहिवासी होते. त्यांच्या निधनानंतर विशेष परवानगी घेऊन पहाटे ३ वाजता शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी त्यांचे पार्थिव विमानाद्वारे बलिया येथे नेण्यात आले. अंत्यसंस्कारासाठी कुटुंबीय आणि नातेवाईक मोठ्या संख्येने तेथे दाखल झाले आहेत.

दरम्यान, अपघात घडवून बस चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपी चालकाचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या दुर्दैवी घटनेमुळे राजकीय वर्तुळातही हळहळ व्यक्त केली जात असून प्रभात सिंह यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला जात आहे.

# लातूर जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी १५१ विहिरींचे अधिग्रहण, जळकोट तालुक्यात ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता, जिल्हा परिषद प्रशासनाकडून विविध उपाययोजना वेगाने राबविल्या जात आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यात ३ टँकर आणि १५१ विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.


सद्यस्थितीत जिल्ह्यातील केवळ जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, तेथील ३ गावे आणि १ वाडी अशा एकूण ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये १ खाजगी आणि २ शासकीय मिळून एकूण ३ टँकर मंजूर करण्यात आले आहे. या टँकर्सच्या माध्यमातून मंजूर केलेल्या ६ खेपांनुसार प्रत्यक्ष पाणीपुरवठा केला जात आहे.

जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे १० एप्रिल २०२६ पासून आणि गव्हाण येथे २४ एप्रिल २०२६ पासून टँकर मंजूर करण्यात आले असून, वंजारवाडा येथे १ जून २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सध्या टँकरसाठी ३ आणि टँकरव्यतिरिक्त इतर पाणीपुरवठ्यासाठी १४८ अशा एकूण १५१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. या अधिग्रहित विहिरींच्या माध्यमातून जिल्ह्यातील एकूण १२५ गावे व वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये अहमदपूर तालुक्यात सर्वाधिक ५२ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, त्याखालोखाल औसा तालुक्यात ३५, जळकोट तालुक्यात १५, निलंगा तालुक्यात १३, उदगीर तालुक्यात ११, रेणापूर तालुक्यात ८, चाकूर तालुक्यात ५, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ६, लातूर तालुक्यात व देवणी तालुक्यात प्रत्येकी ३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

# शेअर्स कॅपीटलमध्ये एमएनएस बँक लातूर जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर- अजित पाटील कव्हेकर

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र नागरी सहकारी बँक ही बँकींग क्षेत्रातील अग्रगण्य बँक आहे. या बँकेच्या माध्यमातून सभासद व ग्राहकांचे हित लक्षात घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बँकेची चौफेर प्रगती साधण्याचे काम सुरू आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी एनईएफटी, आरटीजीएस, मोबाईल बँकींग, फोन-पे, गुगल-पे, होम बँकींग, कोअर बँकींग, एसएमएस बँकींग, ग्राहक सभासदांसाठी विमा सरंक्षण, याबरोबरच एआय सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना सुविधा देण्याचे कार्य महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून बँकेचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचा ३१ मे २०२६ पर्यंतचा प्रगतीचा आलेख चढता राहिलेला आहे. बँकेचे एकूण भाग भांडवल व रिझर्व ४२ कोटी ३२ लाख रूपये आहे. बँकेचा सीआरएआर १५.५२ टक्के आहे. तर बँकेची एकूण गुंतवणूक ६९.७७ कोटी आहे.



बँकेच्या एकूण व्यवसाय २७२.५४ कोटी आहे. त्यापैकी नेट ऑपरेटिव्ह इन्कम १ कोटी ८६ लाख ८९ हजार एवढे आहे. याबरोबरच शेअर्स कॅपीटलमध्ये एमएनएस बँकेचे उत्कृष्ट काम असून यामध्ये महाराष्ट्र नागरी सहकारी बँक लातूर जिल्ह्यामध्ये दुसर्या क्रमांकावर असल्याची माहिती बँकेचे चेअरमन अजित पाटील कव्हेकर यांनी दिली.

महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बँक व्यवस्थापनाने व अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये प्रभावी वसुलीचे धोरण अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने राबवून हे यश मिळवलेले आहे. बँकेचे सर्व सभासद, खातेदार, कर्जदार व हितचिंतकांनी जो विश्वास बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळावर ठेवला व बँकेने वेळोवेळी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दिला. यामुळे हे सर्व शक्य झाले. महाराष्ट्र नागरी बँकेच्या लातूर जिल्ह्यामध्ये चार शाखेचा विस्तार झालेला आहे. तसेच शेजारील जिल्ह्यातही शाखा वाढविण्याचा बँकेचा मानस आहे.

सध्यापर्यंत बँकेचा एकूण व्यवसाय २७२.५४ कोटीवर गेलेला आहे. या यशामध्ये बँकेचे व्यवस्थापकीय मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांनी रिझर्व बँक आणि सहकार खात्याचे नियम, कायदे आणि निकषाचे तंतोतंत पालन करून सभासद, ठेवीदार व खातेदारांचे हित आणि विश्वास जोपासण्याचे कार्य केलेले आहे.

बँकेचे व्यवहार कायम ठेवून प्रगती साधण्याचे काम करावे - नितीन सराफ

बँकेने सभासद व ग्राहकांच्या हिताबरोबरच सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोणातून आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत, मायक्रो फायनांन्सच्या माध्यमातून महिला उद्योजकांना लाखापर्यंतचे विनातारण कर्ज व शेतकरी व निराधार मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेऊन त्यांची प्रगती साधण्याचे कार्यही केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेला राज्याचा सर्वोत्कृष्ट पद्मभूषण वसंतदादा पाटील पुरस्कारासहीत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळालेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या प्रगतीमध्ये यापुढील कालावधीतही आपला सहभाग कायम असावा, सर्व सभासद व ग्राहकांनी आपले व्यवहार महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेत वाढविण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे आवाहन महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक नितीन सराफ यांनी केलेले आहे.


# एलन मस्क बनले जगातील पहिले ट्रिलियनेअर; संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलरवर

नवी दिल्ली : जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जाणारे एलन मस्क यांनी आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. स्पेसएक्स कंपनीच्या आयपीओ नंतर एलन मस्क यांची एकूण संपत्ती तब्बल १.१ ट्रिलियन डॉलर इतकी झाली असून ते जगातील पहिले 'ट्रिलियनेअर' ठरल्याचा दावा केला जात आहे. स्पेसएक्सचा आयपीओ अमेरिकेतील नॅस्डॅक शेअर बाजारात एझ्ऐं या टिकर चिन्हासह सूचीबद्ध झाला. या ऐतिहासिक लिस्टिंगनंतर कंपनीच्या मूल्यांकनात मोठी झेप घेतली असून मस्क यांच्या संपत्तीतही विक्रमी वाढ झाली आहे.

स्पेसएक्सने आपल्या आयपीओद्वारे तब्बल ७५ अब्ज डॉलर निधी उभारला आहे. आयपीओमध्ये कंपनीच्या प्रत्येक शेअरची किंमत १३५ डॉलर निश्चित करण्यात आली होती. लिस्टिंगनंतर कंपनीचे एकूण मूल्यांकन १.७५ ट्रिलियन डॉलर इतके झाल्याचे सांगितले जात आहे. या कामगिरीमुळे स्पेसएक्सचा समावेश जगातील सर्वाधिक म ूल्यांकन असलेल्या कंपन्यांच्या यादीत झाला आहे.

# खरे बोलण्याची हिंमत प्रत्येकात नसते!; समाजभूषण : उत्तमराव तरकसे

**नाशिक कोपरगाव/प्रतिनिधी** : येवला तालुक्यातील पिंपळ गाव जलाल येथे शिवबाबा वाघ प्रतिष्ठान तर्फे सहादू शिवाजी वाघ स्मृती राज्यस्तरीय पाचवा साहित्य कलाकर्ते पुरस्कार वितरण सोहळा २०२६ माजी आमदार स्नेहलता कोल्हे, डॉ नंदकुमार राऊत (आयएएस अधिकारी) दादासाहेब कोते (साहित्यिक ) शर्मिला गोसावी (साहित्यिका ) सौ स्वाती मॅडम (साहित्यिका) रजाक शेख (साहित्यिक) व समाजभूषण उत्तमराव दासू तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करपली भाकर ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडला.





सदर कार्यक्रमात समाजभूषण उत्तमराव तरकसे यांच्या करपली भाकर

या कथासंग्रहास देखील शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान तर्फे उत्कृष्ट कलाकृती २०२६ चा पुरस्कार मिळाल्याने तो त्यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला त्यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला आत्तापर्यंत महाराष्ट्र शासनाचा व पुणे महानगरपालिकेच्या पुरस्कारासह एकूण चार पुरस्कार मिळाले असून हा पुरस्कार पाचवा असल्याचे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जाहीर केले तसेच पुढील मनोगतात त्यांनी खरे बोलण्याची हिंमत प्रत्येकात नसते..!

आणि ज्यो ती हिम्मत दाखवतात, ते नेहमीच एकटे पडतात..!

तेव्हा मात्र ते एकट्याने चालण्याची हिंमत सुद्धा ठेवतात एकला चालो,,,, याप्रमाणे असे समाज प्रबोधनात्मक विचार मांडत शिवबाबा वाघ प्रतिष्ठांच्या मार्गदर्शिका अंजनीबाई वाघ उपाध्यक्ष यमुना गोतीस अध्यक्ष संजय वाघ सचिव राजेश वाघ तसेच वाघ परिवारातील सर्व सदस्यांचा व पुरस्कार निवड समितीचे आभार मानले व पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या

तसेच सदर कार्यक्रमाच्या शेवटी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या साहित्यिक वाचक वर्ग व पुरस्कार विजेते तसेच प्रेक्षक वर्गा व विचार मंचावरील मान्यवराचे संस्थेचे अध्यक्ष संजय वाघ यांनी सर्वांचे आभार मानून उत्कृष्ट व स्वादिष्ट जेवणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## ७.८४ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ ची परतफेड

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ७.८४ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ अदत्त शिल्लक रकमेची १२ जुलै २०२६ पर्यंत देय असलेल्या व्याजासह १३ जुलै २०२६ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

''परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१'' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर १३ जुलै २०२६ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४ (३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ७.८४% महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली, असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केले जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे.

रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणा-या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्रात नमूद केले आहे.

## लेक सरकारी अधिकारी झाली म्हणून साताऱ्यात पेढे वाटले; पण पालघरच्या रस्त्यावर नराधमाने घात केला

**पालघर/प्रतिनिधी :** कामाची लगबग त्याच घरी जाण्याची घाई आणि अचानक मागून झालेला एक जीवघेणा हल्ला. भररस्त्यात घडलेल्या एका अनपेक्षित घटनेने परिसरात एकच आरडाओरड आणि थरकाप उडाला होता. नक्की भररस्त्यात घडलेल्या या कृत्याम ागचे गूढ काय होते आणि हल्लेखोर कोण होता, त्याबाबतीत सविस्तर जाणून घेऊयात.

मिळालेल्या माहितीनुसार, स्नेहल सावंत(वय२८) या पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहाय्यक या पदावर कार्यरत आहे. स्नेहल सांवत या मूळच्या सातारा जिल्ह्यातील दहीवडी येथील रहिवासी आहे. नेहमीप्रमाणे गुरुवारी संध्याकाळी त्यांनी कार्यालयातील त्यांचे काम संपवले आणि पालघर शहरातील गोल्ड सिनेमाजवळील रस्त्याने घरी जात होत्या.दरम्यान याच वेळी अमोल मुळे (वय२९) नावाचा एक तरुण आधीपासून तिथं बसल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान स्नेहल या ज्या दिशेने जात होता तेव्हा तो तिथं आला आणि बॅगेतून कोयता काढून त्यांच्यावर हल्ला केला. अमोलने स्नेहल यांच्यावर पाठीमागून वार केल्याने त्या गंभीर जखमी झाल्या आणि रस्त्यावरच कोसळल्या.

भररस्त्यात घटना घडल्याने परिसरात असलेल्या नागरिकांनी आरडाओरड केली. कमी वेळत लोक जमा झाल्याचे पाहून आरोपी तेथून लगेच पळून गेला. मात्र घाईगडबडीत त्याने त्याची बॅग घटनास्थळीच सोडली.

नागरिकांनी जखमी अवस्थेत असलेल्या स्नेहल यांना तातडीने पालघर ग्रामी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढच्या उपचारासाठी त्यांनी खासगी रुग्णालयात दाखल केले. सध्याच्या स्थितील स्नेहल सावंत यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे.

खरं तर प्राथमिक तपासात हा प्रकार प्रेमसंबंधातून घडल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केलेली आहे. शिवाय आरोपी तरुण आणि स्नेहल सावंत हे दोघेही एकमेंकाच्या ओळखीतील असल्याची माहिती समोर येत असून आरोपी अमोल मुळे हा उच्च न्यायालयात काम करत असल्याचे समजत आहे.

पालघर पोलिसांनी तक्रार दाखल करुन घटनास्थळावरील तसेच आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम करत आहे. महत्त्वाचे म्हणजे सीसीटीव्ही फुटेजच्या आधारेच आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. शिवाय या हल्ल्यामागील नेमके कारण काय होती याचा तपासही पोलीस करत असून लवकरच आरोपीला अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केलेला आहे.

# रक्तदानाच्या माध्यमातून लातूर पोलिसांनी जपली माणुसकीची परंपरा; किल्लारी व गातेगाव येथे १६६ रक्तपिशव्यांचे संकलन





**लातूर/प्रतिनिधी :** समाजाच्या सुरक्षेसाठी खांद्यावर जबाबदारीची वर्दी असली, तरी त्या वर्दीआड धडधडणारे हृदय हे समाजाप्रती संवेदनशील असते, याचा प्रत्यय लातूर जिल्हा पोलीस दलाने पुन्हा एकदा आपल्या कृतीतून दिला आहे. गुन्हेगारी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या पोलिसांनी यावेळी समाजसेवेचा वेगळा आदर्श घालून देत रक्तदानाच्या माध्यमातून अनेक अनोळखी जीवांना नवजीवन देण्याचा संकल्प साकारला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, लातूर पोलीस दल, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ जून २०२६ रोजी किल्लारी व गातेगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाजसेवेच्या कार्यात आपला सहभाग नोंदविला.

आजच्या धावपळीच्या युगात अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध न झाल्याने जीव गमवावा लागतो. अपघातग्रस्त, गंभीर आजारांवरील उपचार घेणारे रुग्ण, शस्त्रक्रियेसाठी दाखल असलेले नागरिक आणि प्रसूतीदरम्यान रक्ताची आवश्यकता असलेल्या महिलांसाठी रक्त हा जीवनाचा आधार ठरतो. या वास्तवाची जाणीव ठेवून शेकडो रक्तदाते या मोहिमेत सहभागी झाले आणि समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण उभे केले.

या शिबिरात किल्लारी येथे ११५ आणि गातेगाव येथे ५१ अशा एकूण १६६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. प्रत्येक रक्तपिशवी ही एखाद्या गरजू व्यक्तीसाठी आशेचा किरण ठरणार असून या रक्तसाठ्यामुळे अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ रक्तदान शिबिर न राहता माणुसकीचा उत्सव ठरला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते लातूर पोलीस व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वन हेल्मेट - वन लाईफ या उपक्रमाचे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदानातून दुसऱ्याचे जीवन वाचविताना स्वतःच्या जीवनाचेही रक्षण करण्याचा संदेश या अभिनव उपक्रमातून देण्यात आला. समाजहित आणि रस्ते सुरक्षा या दोन महत्त्वाच्या विषयांची प्रभावी सांगड घालणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य होते. कारण त्यांनी दिलेले रक्त कोणाच्या तरी आयुष्यात नव्या आशेचा श्र्वास निर्माण करणार होते. समाजात संवेदनशीलता, परस्पर सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे या शिबिरातून अधोरेखित झाले.

लातूर जिल्हा पोलीस दल केवळ कायद्याचे रक्षक नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारा विश्र्वासू मित्र आहे, ही भावना या उपक्रमातून अधिक दृढ झाली आहे. नागरिक आणि पोलीस यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक मजबूत करण्याबरोबरच समाजात रक्तदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण करण्यात या शिबिराला मोठे यश मिळाले. १६६ रक्तपिशव्यांच्या रूपाने जमा झालेला हा अमूल्य रक्तसाठा अनेक गरजू रुग्णांसाठी जीवनदान ठरणार आहे.

## मॅग्नेट-२.0 प्रकल्पांतर्गत राज्यात काढणीपश्चात सुविधांनी युक्त मेगा क्लस्टर्स उभारणार - पणन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** : मॅग्नेट-२.० प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. जागतिक बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधा राज्यातील बाजार व्यवस्थेत निर्माण करण्यात येणार असून, महाराष्ट्रात काढणीपश्चात सुविधांनी युक्त मेगा क्लस्टर्स विकसित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट-२.०) प्रकल्पासाठी मॅपिंग स्टडी व संपूर्ण प्रकल्प आराखडा अंतिम करण्याबाबत पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव विजय लहाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव तसेच प्रकल्पाचे सल्लागार व अन्य अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रकल्पाच्या विविध घटकांचा आढावा घेण्यात आला.

पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, आशियाई विकास बँकेच्या शिफारशींनुसार मॅग्नेट प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत असून, मॅग्नेट-२.० साठी २,४०२ कोटी इतक्या निधीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाने या अतिरिक्त निधीस मान्यता दिली असून, प्रकल्पाला नीती आयोगाची मंजुरी प्राप्त झाली आहे. सध्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाकडून (डिओएएफ ) प्राथमिक प्रकल्प अहवाल (पीपीआर) अंतिम मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.



मॅग्नेट-२.० प्रकल्पातून मुंबई परिसरात नवीन आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समिती उभारणीस बळ मिळणार आहे. तसेच प्रकल्पांतर्गत शेतमालाची मूल्यवर्धन साखळी सक्षम करण्यासाठी, शेतकरी उत्पादक कंपन्या (इफपीओ) आणि व्हॅल्यू चेन ऑपरेटर ( व्हिसीओ ) सदस्यांची क्षमता वाढविणे, उत्तम कृषी पद्धती (जीएपी), काढणीपश्चात व्यवस्थापन, आर्थिक साक्षरता तसेच हवामान अनुकूलतेसंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याबरोबरच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, काढणीपश्चात पायाभूत सुविधा आणि वित्त पुरवठा व्हावा या साठी फायनान्शियल इंटरमीडियरी लोन ( एफआयएल) यांच्या माध्यमातून सुमारे ४०० उपप्रकल्पांना अर्थसाहाय्य करण्यात येणार असल्याचे पणन मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले.

कृषी उत्पादनांसाठी ट्रेसेबिलिटी यंत्रणा विकसित करणे, गुणवत्ता मानकांची पूर्तता करणे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी प्रभावी जोडणी निर्माण करणे, अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देणे, हवामान प्रतिसाद क्षमता वाढविणे, पिकांचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे आणि मागणीआधारित मूल्यसाखळी विकसित करून खाजगी गुंतवणुकीला चालना देणे, ही मॅग्नेट-२.० प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत राज्यातील २३ उच्च मूल्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये केळी, डाळिंब, आंबा, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, सीताफळ, चिकू, स्ट्रॉबेरी, काजू, मिरची, भेंडी, पडवळ, द्राक्षे, पपई, फणस, अंजीर, हळद, आले, शेवगा टोमॅटो आणि फुलशेती या पिकांचा समावेश आहे.

प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीला गती देण्याच्या सूचना देत, पणन मंत्री रावल म्हणाले, केंद्र शासनाकडून अंतिम मंजुरी मिळताच प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण करावी असे निर्देशही त्यांनी दिले.

## नाशिकमध्ये बीएसएनएल केबल चोरी प्रकरणाचा पर्दाफाश, २ कोटींहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त

**नाशिक/प्रतिनिधी :** शहरात बीएसएनएल कंपनीच्या महागड्या भूमिगत तांब्याच्या (यू.जी. केबल) चोरी करणाऱ्या टोळीचा गुन्हे शाखा युनिट क्रमांक एक, गुंडा पथक व अंबड गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत पर्दाफाश करण्यात आला असून एकूण २ कोटी ८८ लाख ४२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शहरात वायर चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी संबंधित गुन्ह्यांचा शोध घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सन २०२४ मध्ये नाशिकरोड हद्दीत बीएसएनएल कार्यालयाजवळ बीएसएनएल कंपनीची भूमिगत कॉपर व ॲल्युमिनियम केबल चोरी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासात निष्पन्न झाले की चोरी केलेला बीएसएनएल कंपनीचा भूमिगत कॉपर केबल माल मुंबईतील भांडुप परिसरातील एका गोदामात साठवून ठेवण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने भांडुप पश्चिम, मुंबई येथे छापा टाकून कारवाई केली.

तेथे सुमारे साडेसतरा टन विविध रंगांचे अखंड व तुकडे केलेले ॲल्युमिनियम केबल, साडेचौदा टन जळून वेगळे केलेले कॉपर वायर्स आणि दीड टन विविध रंगांचे ॲल्युमिनियम केबलचे तुकडे असा एकूण दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख चाळीस हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सहा आरोपींना अटक

तपासादरम्यान गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकच्या पथकाने आरोपींचा शोध घेऊन वाहाब अब्दुल नवाज, सुरेश दिलीप वैराळ , बस्तीलाल राजाराम यादव , कमलेशकुमार सुखदेव रविदास , तनवीर मुफ्फिर शेख आणि राजकुमार केशूलाल जैन या सहा आरोपींना अटक केली.

या प्रकरणाचा पुढील तपास गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकमार्फत सुरू आहे. दरम्यान अटक आरोपींकडून नाशिक शहरातील सरकारवाडा, मुंबई नाका पोलीस ठाणे, इंदिरानगर पोलीस ठाणे आणि म्हसरूळ पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे उघडकीस आले आहेत. ही संपूर्ण कारवाई गुन्हे शाखा युनिट क्रमांक एक, गुंडा पथक व अंबड गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पथकातील अधिकाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली आहे.

## नागपूर शहरात गेल्या १२ वर्षांत मोठ्या प्रमाणावर विकासकामे; २५ लाख वृक्ष लागवडीद्वारे हरित नागपूर घडविण्याचा संकल्प : नितीन गडकरी

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर शहर आणि जिल्ह्यात २५ लाख वृक्षांची लागवड करून नागपूरला 'हरित शहर' बनविण्याचा संकल्प व्यक्त केला. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रम ाअंतर्गत शाळा, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, राजकीय पक्ष आणि इतर भागधारकांना २ ते ३ मीटर उंचीची रोपे उपलब्ध करून देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि संवर्धनाचे काम हाती घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या १२ वर्षाच्या कार्यपूर्ती निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद आयटीआयच्या कॅम्पस प्लेसमेंटमधून २३ युवकांना नोकरीची संधी

## कॅम्पस मुलाखती : २३ विद्यार्थ्यांना मिळणार १८ ते २३ हजारापर्यंत मासिक पगार

**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद आयटीआय लातूर यांच्या सहकार्यातून प्रो.आर्क वेल्डिंग कटिंग सिस्टम प्रायव्हेट लि.पुणे कंपनीच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्युवमध्ये एकूण ३६ युवकांपैकी २३ जणांची निवड कंपनीने केली आहे. या युवकांना पुण्यातील नोकरीतून १८ ते २३ हजारापर्यंत मासिक पगार मिळणार असल्याने अत्यंत कमी कालावधीत कॅम्पस मुलाखतीच्या माध्यमातून मिळालेल्या नोकरीमुळे त्यांचे कौतुक होत आहे.

या कॅम्पस इंटरव्युवमध्ये इलेक्ट्रिशियन ट्रेडसाठी आशिष येलगटे, उदय महापुरे, आयास तांबोळी, आरबाज शेख, राम गवळी, समाधान धिंगाने, विशाल कांबळे



यांची निवड झाली आहे तर वायरमन ट्रेडसाठी सिध्दार्थ आदमाने, अभिषेक काळे, आदित्य काचे यांची तर फिटर ट्रेडसाठी अभिषेक क्षिरसागर, अमित राठोड, अंकुर बने, जय राठोड, कार्तिक दिवटे, प्रदीप ढोरमारे, रोहन बाहेती, संकेत अंधारे, श्रीराम माने, तेजस गडाडे, प्रेम कांबळे आदींची निवड करण्यात आलेली आहे. या सर्व निवड झालेल्या युवकांना कॅम्पस मुलाखतीनंतर जॉईनिंग लेटर देण्यात आले असून त्यांना प्लेसमेंट १८००० रूपये देण्यात येणार आहे तर छ-झड पोर्टलवर कंपनीचे रजिस्ट्रेशन असेल तर जास्तीचे पाच हजार रूपये मिळणार आहे.

आयटीआय च्या कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई पाटील कव्हेकर, जेएसपीएम उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, नगरसेविका आदितीताई पाटील कव्हेकर, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील रावनगावकर, समन्वयक बापूसाहेब गोरे, विनोद जाधव, अनिरूध्द पाटील, कॅम्पस एचआर बळीराम खांडेकर, प्रो.आर्क वेल्डिंग कटिंग सिस्टम प्रायव्हेट लि.पुणेचे एच.आर हेड तौफिक सामळेवाले, प्रोडक्शन टीम लिडर श्रीकेश्वर स्वामी, स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य लक्ष्मीकांत गौड, अप्रेंटिसिप सेलचे विभागीय समन्वयक कृष्णा तांदळे, शासकीय आयटीआय प्लेसमेंट ऑफीसर अनंत शेंद्रे, स्वामी विवेकानंद आयटीआयचे समन्वयक व्ही. के.गाडेकर, प्राचार्य संदीप पांचाळ, स्वामी विवेकानंद आयटीआयच्या निर्देशिका गितांजली पांचाळ, निर्देशक आडे, निर्देशक आसिम, निर्देशिका वैष्णवी बेद्रे, सेविका शुभांगी मलिषे आदींनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.